SUPPLEMENT

TO THE

# BOMBAY GOVERNMENT GAZETTE.

Published by Authority.

THURSDAY, 6TH MARCH 1862.

## PROCEEDINGS OF THE LEGISLATIVE DEPARTMENT, BOMBAY.

THE following extract from the Proceedings of His Excellency the Governor of Bombay in Council, assembled for the purpose of making Laws and Regulations, is hereby published for the information of all whom it may concern :—

*1st March* 1862.

The Council of the Governor of Bombay, for the purpose of making Laws and Regulations, met according to adjournment.

*PRESENT* :—

THE HONORABLE MR. REEVES,
THE HONORABLE MR. FRERE,
THE HONORABLE MR. WESTROPP,
THE HONORABLE MR. TRISTRAM,
THE HONORABLE THE NAWAB OF SAVANOOR,
THE HONORABLE MR. RUSTOMJEE JAMSETJEE JEJEEBHOY,
THE HONORABLE MR. MADHOOROW VITTUL VINCHOORKUR,
THE HONORABLE MR. JUGGONATH SUNKERSETT,
THE HONORABLE MR. PREMABHAI HEMABHAI,
And the DEPUTY SECRETARY.

Mr. REEVES being the Senior Ordinary member of Council present, presided in the absence of the Governor.

The DEPUTY SECRETARY said he had just received a Petition in the Gujarati Language addressed to the Legislative Council.

Mr. FRERE said that there were two objections to its reception :—

*1st*—That it was addressed to the Legislative Council, instead of the Governor in Council.

*2nd*—That it was not accompanied by any translation.

The Petition was accordingly not received.

The PRESIDENT said that the first subject for the consideration of the Council was to consider further the letter from the Government of India, No. 214, dated 13th January 1862, desiring certain amendments to be made in the Rules of the Council, and the Draft Rules prepared by Mr. Westropp.

These rules were presented at the last Meeting of the Council, and the question now was whether they should be adopted.

Mr. WESTROPP said he had some formal amendments to make which he had furnished to the Deputy Secretary; but before they were read, he should be glad to know if any objections existed to the substance of them.

Mr. FRERE suggested that the Members should be asked whether there was any objection to them *seriatim*.

The PRESIDENT put the question as to Rule 1.

*Agreed to.*

The PRESIDENT put Rule 2.

*Agreed to.*

The PRESIDENT put Rule 3.

*Agreed to.*

The PRESIDENT put Rule 4.

Mr. FRERE thought there would be no necessity for the proviso at the end.

Mr. WESTROPP thought that, if the Governor was to have the power, it would be better to say so; that frequently circumstances might take place which would render it desirable for the Council to meet at another hour besides 11 o'clock.

Mr. TRISTRAM agreed with Mr. Westropp.

The PRESIDENT thought the hour might very well be left to the Council; that the Governor had a very strong objection to frequent alterations.

Rule as printed *agreed to.*

Mr. WESTROPP asked whether there would be any objection to the day of meeting being changed from Saturday to Wednesday.

*No objection was made.*

The PRESIDENT put Rule 5.

*Agreed to.*

The PRESIDENT put Rule 6.

*Agreed to.*

The PRESIDENT put Rule 7.

*Agreed to.*

The PRESIDENT put Rule 8.

*Agreed to.*

The PRESIDENT put Rule 9.

*Agreed to.*

The PRESIDENT put Rule 10.

*Agreed to.*

The PRESIDENT put Rule 11.

Mr. MADHOOROW VITTUL VINCHOORKUR suggested that the word "Secretary" should be inserted instead of "Member" in the first line.

Mr. FRERE thought that the word "Member" should be retained, as it was not desirable that the Secretary should take part in the debates.

Mr. JUGGONATH SUNKERSETT and the other members agreed that the word should remain as it was.

*Agreed to.*

The PRESIDENT put Rule 12.

Mr. FRERE asked why the word "Canarese" was left out.

Mr. WESTROPP said he had learnt from Mr. Shaw Stewart that it would be attended with considerable expense, and that there was at present no necessity for the translations being made into that language.

Mr. FRERE said there were a great many people who did not know Marathi.

Mr. RUSTOMJEE JAMSETJEE JEEJEEBHOY thought the word should be Hindustanee.

The NAWAB OF SAVANOOR said that Canarese was necessary for the people in the country.

Mr. JUGGONATH SUNKERSETT was in favour of Canarese.

Mr. FRERE said the copies for the Members of Council were in manuscript.

The PRESIDENT said it was unnecessary for the Members of the Council.

Mr. TRISTRAM thought that when a Bill was passed into law it should be translated into every language.

Mr. WESTROPP said he was in favour of a Bill, directly it was proposed, being translated into Canarese.

The PRESIDENT put the question whether the word "Canarese" should be inserted after the word "Marathi."

*Agreed to.*

Mr. WESTROPP proposed the amendments, viz. to substitute "amongst" for "to" in the last line but three, and to insert "Bombay" before "Government" in the last line but one.

*Agreed to.*

The PRESIDENT put Rule 13.

*Agreed to.*

The PRESIDENT put Rule 14.

Mr. FRERE suggested the insertion of the word "Canarese" after the word "Marathi" in the 5th line.

*Agreed to.*

The PRESIDENT put Rule 15.

*Agreed to.*

The PRESIDENT put Rule 16.

*Agreed to.*

The PRESIDENT put Rule 17.

A discussion then ensued on this rule between the PRESIDENT, Mr. FRERE, and Mr. WESTROPP.

*Agreed to.*

The PRESIDENT put Rule 18.

Mr. WESTROPP proposed a formal amendment by the insertion of the following words after the word "Bill" in the 3rd line "or not published by order of the Governor in Council under Rule 14." That amendment was necessary to render the rule consistent with the other rules.

*Agreed to.*

The President put Rule 19.

Mr. Frere hardly thought the rule necessary, as we could trust the members not to bring forward a rejected bill again during the same session.

Mr. Westropp thought that if the course of conduct provided against by the rule was expected it would be better to retain it.

*Agreed to.*

The President put Rule 20.

*Agreed to.*

The President put Rule 21.

*Agreed to.*

The President put Rule 22.

*Agreed to.*

The President put Rule 23.

*Agreed to.*

The President put Rule 24.

Mr. Frere would not suggest that the reports be circulated in Canarese.

*Agreed to.*

The President put Rule 25.

Mr. Frere doubted the necessity of the words "but not until a week after the report has been furnished to the members."

Mr. Westropp thought the rule necessary in order to prevent hasty legislation, which the Council might fall into unless the rule was retained.

The President thought it a doubtful point.

Mr. Westropp thought that three weeks was the shortest time for a legislative measure to be before the Public.

Mr. Frere thought that as the Council had power to adjourn the consideration of any measure, he was not in favour of the rule as it stood.

The other members expressed opinions in favour of the rule.

*Agreed to.*

The President put Rule 26.

Mr. Westropp argued in favour of the rule, and said that the President could not refuse, under Rule 27, to allow an amendment to be considered. The two Rules 26 and 27 were to be taken together.

Mr. Frere asked whether there was any objection to the substitution of the word "may" for "shall" in the 5th line.

Mr. Westropp said he had no objection.

The President put the question whether the word "may" should be substituted for "shall."

*Agreed to.*

The rule as amended was then agreed to.

The President put Rule 27.

*Agreed to.*

The President put Rule 28.

*Agreed to.*

The PRESIDENT put Rule 29.

*Agreed to.*

The PRESIDENT put Rule 30.

*Agreed to.*

The PRESIDENT put Rule 31.

*Agreed to.*

The PRESIDENT put Rule 32.

*Agreed to.*

The PRESIDENT put Rule 33.

MR. FRERE thought the concluding words ought to be omitted, as provision was already made in the 45th Section of the 24th and 25th Victoria c. 67.

MR. WESTROPP had merely followed the Governor General's rule, but had no objection to Mr. Frere's amendment.

The PRESIDENT put to the vote whether the words "in case of an equality of voices, the President shall have the casting vote" be omitted.

*Agreed to.*

The rule as amended was then *agreed to.*

The PRESIDENT put Rule 34.

*Agreed to.*

The PRESIDENT put Rule 35.

*Agreed to.*

The PRESIDENT put Rule 36.

*Agreed to.*

The PRESIDENT put Rule 37.

*Agreed to.*

The PRESIDENT put Rule 38.

MR. FRERE thought the words "Under Secretary or Assistant Secretary" should be omitted.

The PRESIDENT agreed that there was no necessity for the words "Under Secretary or Assistant Secretary," inasmuch as the word Secretary was fully defined in Rule 44.

The PRESIDENT proposed that the words "Under Secretary or Assistant Secretary" be omitted.

*Agreed to.*

The rule as amended was then *agreed to.*

The PRESIDENT put Rule 39.

*Agreed to.*

The PRESIDENT put Rule 40.

*Agreed to.*

The PRESIDENT put Rule 41.

*Agreed to.*

The PRESIDENT put Rule 42.

*Agreed to.*

The PRESIDENT put Rule 43.

Mr. FRERE thought the rule unnecessary.

Mr. WESTROPP was of opinion that it was better to make the provisions as clear as possible.

Mr. JUGGONATH SUNKERSETT saw no objection to the rule.

Mr. RUSTOMJEE JAMSETJEE JEJEEBHOY thought the rule might be dispensed with, as the matter was sufficiently provided for by Rule 8.

The PRESIDENT thought as the members were in general averse to it, it should be rejected.

*Rule rejected.*

The PRESIDENT put Rule 44, and suggested that 44 should be altered to 43.

*Agreed to.*

Mr. WESTROPP suggested that in printing the rules as amended the references to the Bombay Rules be omitted.

*Agreed to.*

The PRESIDENT moved that the Rules as amended be printed, and a copy of them be forwarded to His Excellency the Governor for his approval.

The PRESIDENT said the next subject was that a Bill (No. 2) for extending the powers of Municipal Commissioners appointed under Act XXVI. of 1850 be reconsidered. He moved that the Bill be read a second time.

Mr. WESTROPP proposed the omission of the word "accruing" in the 15th line from the end of the bill.

*Agreed to.*

Mr. FRERE moved that the word "Suburbs" in the 8th line of the 1st Section be altered to "Suburb."

*Agreed to.*

Mr. FRERE said that under the 1st Section, 25 per cent. might be expended on a Hospital, 25 per cent. on a Dispensary, and 25 per cent. on a School, in other words 75 per cent. in one town or suburb.

Mr. WESTROPP thought that the legal construction would not be so.

Mr. JUGGONATH SUNKERSETT said there was no provision for watering the streets. He moved that the word "watering" be added.

Mr. FRERE thought it better to wait until complaints were made.

Mr. JUGGONATH SUNKERSETT then proposed that after the words "paying the same," another recital be inserted, "and whereas it is also expedient that in addition to the above purposes, the said Commissioners should be authorized to apply a reasonable portion of the said taxes in the watering of public streets and roads in the said town or suburb," and that a 3rd Section be added as follows :—

3rd. "It is hereby also enacted, that the said Commissioners may also apply a reasonable portion of the Municipal taxes in watering the public streets and roads of any such town or suburb as aforesaid."

Mr. FRERE thought it far better to leave the Bill as it was.

Mr. TRISTRAM thought it rather fine-drawn legislation.

Mr. WESTROPP said it was very doubtful whether under Act XXVI. of 1850 the Commissioners had power to water the streets. He thought it most desirable that they should have it, if they had not got it already, and further that an indemnity clause should be added.

Mr. PREMABHAI HEMABHAI was against the amendment.

The PRESIDENT, after the opinion of the members had been asked, said that the amendment was carried.

Mr. WESTROPP then proposed the indemnity clause.

The PRESIDENT put the following clause.

4th. " And it is hereby also enacted, that any portion of the municipal taxes heretofore *bonâ fide* employed in watering any public street or road in any such town or suburb as aforesaid, shall be considered to have been legally and properly so applied."

*Carried unanimously.*

Mr. FRERE proposed that the word " not" be inserted in the 10th line of the 1st Section between " extent" and " exceeding," and the words " in the whole" added after the word " exceeding, " and the words " all or any of" inserted between the words " for" and " the" in the 12th line, and the word " three" inserted between the words " the" and " purposes" in the same line.

*Carried.*

Mr. FRERE proposed the insertion of the words " on the subject" after the word " report" in the 6th line of the 2nd section.

*Carried.*

The PRESIDENT proposed that the Bill as amended be now read a 2nd time and passed.

The Bill was read by the Deputy Secretary a second time and passed.

The PRESIDENT said the next subject was " a Bill to Amend Act XI. of 1843," which was referred to a select committee.

The committee had reported, and he requested the Deputy Secretary to read the Report.

The DEPUTY SECRETARY read the following Report :—

*Report of the Select Committee appointed to Consider and report on a Bill to amend Act XI. of* 1843.

The Committee having considered the Bill beg to suggest the following amendments :—

That the words " in future" be inserted between the words " should" and " be" in the 2nd line of the Preamble of the Bill, and the word " or" be substituted for " and" in the 3rd line of the Preamble.

That the words " to sanction" be substituted for the words " of sanctioning" in the 4th line of the Preamble, and the words " to approve" be substituted for the words " of approving" in the 7th line of the Preamble.

That the words " a Holder of or" be inserted before the words " a sharer in a Wuttun" in the 5th line of the Preamble.

That the word " a" be inserted before the word " Revenue," and the words " or a Police " before the word " Commissioner " in the 2nd and 6th lines of the Bill ; and that the word " respectively " be inserted between the words " when " and " authorized " in the 2nd and 7th lines of the Bill.

That the words " from and after the passing of this Act" be inserted between the words " shall" and " be" in the 11th line of the Bill.

The Committee would therefore suggest that the Bill be read as follows : —

*A Bill to Amend Act XI. of* 1843.

Whereas it is desirable that the Government of Bombay should in future be empowered to depute authority to the Revenue or Police Commissioners to sanction the term for which a Holder of or sharer in a Wuttun nominated under Section 4 of Act XI. of 1843 shall hold office and to approve of selections made by the Collector or Controlling Officer under the same Section :

It is hereby enacted, that the words " *or a Revenue or a Police Commissioner when respectively authorized by Government*" shall be inserted after the words " with the sanction of the Governor in Council" in Section 4 of Act XI. of 1843, and that the words " *or a*

*Revenue or a Police Commissioner when respectively authorized by Government*" shall be added after the words " to the approval of the Governor in Council" at the end of the said Section ; and that the words so inserted shall from and after the passing of this Act be taken as part of the said fourth Section of Act XI. of 1843.

Mr. FRERE objected to the words " or Police Commissioners" in the Preamble. He thought the Government ought not to have the power to authorize Revenue Commissioners to interfere with Police Commissioners.

Mr. WESTROPP said the objection might be removed by using the words " Revenue and Police Commissioners or either of them."

Mr. FRERE finally proposed to substitute the word "and" for " or" in the 4th line of the Preamble, to omit the words " respectively" in the 2nd, 3rd, and 7th lines of the Bill, and to insert the word " of" between the words " or" and "a" in the 1st and 2nd lines of the Bill, and between the similar words in the 6th and 7th lines of the same.

The PRESIDENT agreed and proposed that the Bill thus amended be read a second time and passed.

The Bill as amended was then read by the Deputy Secretary a second time and passed.

The PRESIDENT said the next subject for consideration was " a Bill for extending the jurisdiction of the Subordinate Civil Courts to the same as that exercised by similar Courts on the other side of India," referred to a Select Committee at the last meeting of the Council.

He moved that the Deputy Secretary should read the Report.

The DEPUTY SECRETARY read the following Report :—

*Report.*

" The Committee report that they are of opinion that provided it is considered necessary that the jurisdiction of Moonsiffs should in certain cases be final, decisions of the Sudder Ameens and Principal Sudder Ameens should in certain cases be also made final.

The Committee are also of opinion that instead of referring to Section 3 of Act XLII. of 1860 the purport of that Section should be embodied in the Act, but as the first proposal if adopted would lead to a further reference to the Judges of the Sudder Dewanee Adawlut, the Committee are of opinion that the whole Act should be recast, and they would further suggest that all Acts defining the jurisdiction of the Principal Sudder Ameens, the Sudder Ameens and Moonsiffs should be consolidated ; there being some Zillahs in which there are no Sudder Ameens and another in which there is no Principal Sudder Ameen.

Mr. FRERE moved that the Report be adopted.

Mr. WESTROPP argued in support of the suggestions of the Select Committee, and that the subject should be more fully considered during the Recess.

The motion that the Report be adopted was then *carried unanimously*.

The PRESIDENT proposed that Mr. Frere should take his (the President's) place in the Select Committee on " the Bill for the preservation of the Bagdaree Tenure."

*Agreed to.*

The PRESIDENT stated that at the next Meeting he intended to introduce a Bill for the restoration of the Grassias in the Ahmedabad Collectorate, and for their relief from debt.

The PRESIDENT then adjourned the Meeting till Saturday the 8th instant at 11 A.M.

*By order of His Excellency the Governor in Council,*

LYTTELTON H. BAYLEY,

Deputy Secretary to Government.

*Bombay Castle, 1st March 1862.*

# मुंबई येथील लेजिस्लेटिव डिपार्टमेंटाचें प्रोसिडिंग.

कायदे व कानू करण्यासाठीं बंदेगान आली नवाब मुस्तताब हजरत आनरबल् गवरनर साहेब बाहादूर जंजिरे मुंबई यांचें कौन्सिल भरलें होतें त्यावेळीं काम चाललें त्यांतील खालीं लिहिलेला उतारा सर्वांस जाहीर होण्यासाठीं प्रसिध्ध केला आहे.

तारीख १ ली माहे मार्च सन १८६२.

कायदे व कानू करण्यासाठीं मुंबईचे गवरनर साहेबांचे कौन्सिलाची सभा आजच्या दिवसापर्यंत तहकूब केली होती त्याप्रमाणे आज पुनः भरली.

हजर.

आनरबल् रीवझ साहेब.
आनरबल् फ्रीयर साहेब.
आनरबल् वेस्राप साहेब.
आनरबल् ट्रिस्राम साहेब.
आनरबल नवाब साहेब सावनूर येथील.
आनरबल रस्तमजी जमसेटजी जीजीभाई साहेब.
आनरबल रावबाहादूर माधवराव विठ्ठल विंचुरकर.
आनरबल जगंनाथ शंकरशेट साहेब.
आनरबल् शेट प्रेमाभाई हेमाभाई.
आणि डेपुटी सेक्रेटारी साहेब.

कौन्सिलाचे आर्डिनरी मेंबर हजर होते त्यांपैकीं आनरबल् रीवझ साहेब सिनियर असल्यामुळें ते, गवरनर साहेब आले नव्हते सबब प्रसिडेंट झाले.

डेपुटी सेक्रेटारी साहेब ह्मणाले कीं लेजिस्लेटिव कौन्सिलाचे नावाची एक गुजराथी अर्जी नुकतीच आह्माकडे आली आहे.

आनरबल् फ्रीयर साहेब ह्मणाले कीं ती अर्जी घेण्यास दोन हरकती आहेत त्या येणे प्रमाणेः—

१ ली.—ती अर्जी गवरनर इन् कौन्सिलाचे नावें असावी तशी नसतां ती लेजिस्लेटिव कौन्सिलाचे नावानें लिहिली आहे.

२ री— तिज बरोबर तिचें इंग्रजी भाषांतर नाहीं.

यावरून ती अर्जी घेतली नाहीं.

प्रेसिडेन्ट साहेब ह्मणाले कीं कौन्सिलाचे नियमांत कांहीं फेरफार करण्याविषयीं इंडिया सरकाराकडून १३ वे ज्यान्युआरी सन१८६२चें २१४ वे नंबराचें पत्र आलें आहे त्याचा आणखी विच्यार,आणि आनरबल् वेस्राप साहेबानी नियमांचा मसुदा तयार केला आहे त्याचा विच्यार कौन्सिलास प्रथम करणें आहे.

हे नियम कौन्सिलाचे मागले सभेंत रुजू केले होते,आणि आतां ते मंजूर करावे किंवा नाहीं याचा मात्र निश्चय करणें राहिला आहे.

आनरबल वेस्राप साहेब ह्मणाले कीं आह्मास नियमांत कांहीं नुस्ते शब्दांचे मात्र फेरफार करावयाचे आहेत ते आह्मी डेपुटी सेक्रेटारी साहेबांकडे लिहून पाठविले आहेत. परंतु ते वाचण्यापूर्वीं; नियमांचे मतलबाविषयीं कांहीं हरकत असल्यास ती आणण्याची आमची इच्छा आहे.

आनरबल् फ्रीयर साहेब ह्मणाले कीं नियमांस हरकत आहे किंवा नाहीं असें मेंबरांस अनुक्रमाने दरएक एक नियमाविषयीं विच्यारावें.

मग प्रेसिडेन्ट साहेबानी १ ले नियमाविषयीं विच्यारलें. — तो कबूल झाला.

प्रेसिडेंट साहेबानी २ रे नियमाविषयीं विच्यारलें. — तो कबूल झाला.

प्रेसिडेंट साहेबानी ३ रे नियमाविषयीं विच्यारलें — तो कबूल झाला.

प्रेसिडेंट साहेबानी ४ थे नियमाविषयीं विच्यारलें.

तेव्हां आनरबल फ्रीयर साहेब ह्मणाले कीं या नियमाचे शेवटी विशेष ठराव आहे तो जरूर आहे असें आह्मास वाटत नाहीं.

यावर आनरबल् वेस्राप साहेब ह्मणाले कीं तो अधिकार गवरनर साहेब बाहादूर यांस असावा असा हेतु असेल तर त्या प्रमाणे नियमांत ल्याहावें हें बरें. कारण ११ वरा रवेरीज इतर वेळीं कौन्सिल भरणें योग्य असा प्रसंग वारंवार येण्याचा संभव आहे.

आनरबल् ट्रिस्राम साहेब ह्मणाले कीं आमचें मत आनरबल् वेस्राप साहेबांचे मतासारिखें आहे.

प्रेसिडेन्ट साहेब ह्मणाले कीं वेळ ठरविण्याचें काम कौन्सिलाकडे असलें ह्मणजे फार बरें. कारण वारंवार फेरफार करणें हें गवरनर साहेबांस आवडत नाहीं.

नंतर नियम जसा छापला होता तसाच सर्वांनी कबूल केला.

आनरबल् वेस्राप साहेब ह्मणाले कीं सभेचा दिवस शनवार आहे तो बदलून बुधवार ठरविण्यास कांहीं हरकत आहे काय? — कोणी हरकत घेतली नाहीं.

प्रेसिडेंट साहेबानी ५ वे नियमाविषयीं विच्यारलें. — तो कबूल झाला.

प्रेसिडेंट साहेबानी ६ वे नियमाविषयीं विच्यारलें. — तो कबूल झाला.

प्रेसिडेंट साहेबानी ७ वे नियमाविषयीं विच्यारलें. — तो कबूल झाला.

प्रेसिडेंट साहेबानी ८ वे नियमाविषयीं विच्यारलें. — तो कबूल झाला.

प्रेसिडेंट साहेबानी ९ वे नियमाविषयीं विच्यारलें. — तो कबूल झाला.

प्रेसिडेंट साहेबानी १० वे नियमाविषयीं विच्यारलें. — तो कबूल झाला.

प्रेसिडेन्ट साहेबानी ११ वे नियमाविषयीं विच्यारलें.

तेव्हां आनरबल् राव बाहादुर माधवराव विठ्ठल विंचुरकर ह्मणाले कीं पहिले ओळींत "मेंबर" या शब्दा बद्दल "सेक्रेटारी" हा शब्द घालावा.

त्यावर आनरबल् फ्रीयर साहेब ह्मणाले कीं "मेंबर" हाच शब्द ठेवला पाहिजे. कारण कौन्सिलांत वाद विवाद होतील त्यांत सेक्रेटारी साहेबांची दरवलगिरी योग्य नाहीं.

तो शब्द आहे तसाच असावा ही गोष्ट आनरबल् जगंनाथ शंकरशेट साहेबानी व दुसरे मेंबरानी कबूल केली. — तो नियम कबूल झाला.

प्रेसिडेंट साहेबानी १२ वे नियमाविषयीं विच्यारलें.

तेव्हां आनरबल् फ्रीयर साहेबानी विच्यारलें कीं "कानडी" हा शब्द कां काढून टाकला आहे?

यावर आनरबल् वेस्राप साहेब ह्मणाले कीं तेणेंकरून फार खर्च पडेल आणि त्या भाषेंत तर्जुमे करण्याची हाल्लीं गरज नाहीं असें श्या. स्टयूवर्ट साहेबानी आह्मास कळविलें आहे.

मग आनरबल् फ्रीयर साहेब ह्मणाले कीं मराठी येत नाहीं असे पुष्कळ लोक आहेत.

आनरबल रस्तमजी जमसेटजी जीजी भाई साहेब ह्मणाले कीं हिंदुस्थानी असा शब्द असावा.

आनरबल् सावनूरकर नवाब साहेब ह्मणाले कीं जिल्ह्यांतील लोकांस कानडी अवश्य आहे.

आनरबल् जगंनाथ शंकरशेट साहेबांचे मतें कानडी हा शब्द असावा.

आनरबल् फ्रीयर साहेब ह्मणाले कीं कौन्सिलाचे मेंबरांसाठीं प्रतीलिहून तयार होतात.

प्रेसिडेन्ट साहेब ह्मणाले कीं मेंबरांचे कौन्सिलास कानडीची गरज नाहीं.

आनरबल् ट्रिस्राम साहेब ह्मणाले कीं आक्टाचा मसुदा कायम होऊन तो कायदा ठरला ह्मणजे त्याचा प्रत्येक भाषेंत तर्जुमा केला पाहिजे.

आनरबल् वेस्त्राप साहेब ह्मणाले कीं आक्टाच्या मसुदा रुजू केला ह्मणजे लागलेंच त्याचें कानडी भाषांतर करयावें असें आमच्चें मत आहे.

नंतर प्रेसिडेंट साहेबांनी असें विच्यारलें कीं "मराठी" या शब्दा पुढें "कानडी" हा शब्द घालाया किंवा नाहीं.- घालावा ही गोष्ट कबूल झाली.

आनरबल् वेस्त्राप साहेब ह्मणाले कीं खालीं लिहिलेले फेरफार करावे ते येणे प्रमाणेः— खालपासून ४ थे ओळींत "टू" या इंग्रजी शब्दाबद्दल "अमेंग्स्ट" हा इंग्रजी शब्द घालावा आणि खालपासून दुसरे ओळींत "सरकार" या शब्दा मागें "मुंबईच्चें" हा शब्द घालावा.- तो कबूल झाला.

प्रेसिडेंट साहेबानी १३ वे नियमा विषयीं विच्यारलें.— तो कबूल झाला.

प्रेसिडेंट साहेबानी १४ वे नियमा विषयीं विच्यारलें.

तेव्हां आनरबल् फ्रीयर साहेब ह्मणाले कीं ५ वे ओळींत "मराठी" या शब्दापुढें "कानडी" हा शब्द घालावा.— ही गोष्ट कबूल झाली.

प्रेसिडेंट साहेबानी १५ वे नियमा विषयीं विच्यारलें.—तो कबूल झाला.

प्रेसिडेंट साहेबानी १६ वे नियमा विषयीं विच्यारलें.—तो कबूल झाला.

प्रेसिडेंट साहेबानीं १७ वे नियमा विषयीं विच्यारलें.

तेव्हां या नियमा विषयीं प्रेसिडेंट साहेब व आनरबल् फ्रीयर साहेब व आनरबल् वेस्त्राप साहेब यांजमध्यें वादविवाद झाला.— नंतर तो कबूल झाला.

प्रेसिडेंट साहेबानीं १८ वे नियमा विषयीं विच्यारलें.

तेव्हां आनरबल् वेस्त्राप साहेब ह्मणाले कीं ३-या ओळींत "आक्टाचा मसुदा" या शब्दांपुढें "किंवा गवरनर इन् कौन्सिलाचे हुकुमावरून १४ वे नियमा अन्वयें प्रसिध्ध झाला नसेल" हे शब्द घालावे असा फेरफार करावा. हा नियम दुसरे नियमास अनुसरून असण्याविषयीं सदहू फेरफार करणें अवश्य आहे.— ही गोष्ट कबूल झाली.

प्रेसिडेंट साहेबानीं नंतर १९ वे नियमा विषयीं विच्यारलें.

तेव्हां आनरबल् फ्रियर साहेब ह्मणाले कीं या नियमाची गरज नाहीं, कारण नामंजूर केलेला आक्टाचा मसुदा कोणी मेंबर त्याच सेशनांत पुनः गुजारणार नाहींत असा भरोंसा आहे.

आनरबल वेस्त्राप साहेब ह्मणाले कीं या नियमांत ज्या प्रमाणें वर्तणूक करूं नये ह्मणून सांगितलें आहे त्या प्रमाणे कोणी मेंबर वर्तणूक करतील असें वाटत असेल तर हा नियम ठेवणें हें नीट आहे.

नियम ठेवावा ही गोष्ट कबूल झाली.

प्रेसिडेंट साहेबानी २० वे नियमा विषयीं विच्यारलें.—तो कबूल झाला.

प्रेसिडेंट साहेबानी २१ वे नियमा विषयीं विच्यारलें.—तो कबूल झाला.

प्रेसिडेन्ट साहेबानी २२ वे नियमा विषयीं विच्यारलें.— तो कबूल झाला.

प्रेसिडेंट साहेबानीं २३ वे नियमा विषयीं विच्यारलें.— तो कबूल झाला.

प्रेसिडेंट साहेबानीं २४ वे नियमा विषयीं विच्यारलें.

तेव्हां आनरबल् फ्रियर साहेब ह्मणाले कीं रिपोर्टीचें कानडी भाषांतर करयून तें मेंबरांकडे पाठवावें असें आमच्चें मत नाहीं.- ही गोष्ट कबूल झाली.

प्रेसिडेंट साहेबानीं २५ वे नियमा विषयीं विच्यारलें.

तेव्हां आनरबल फ्रियर साहेब ह्मणाले कीं "परंतु मेंबरांकडे रिपोर्ट पाठवून एक आठवडा झाल्याचांचून," हे शब्द असणें जरूर आहे कीं नाहीं याविषयीं आह्मास अंदेशा आहे.

त्यावर आनरबल् वेस्त्राप साहेब ह्मणाले कीं हा नियम न ठेयला तर कौन्सिल उतावळीनें कायदे करूं लागेल तसें न होऊं देण्यासाठीं हा नियम ठेवणें अवश्य आहे.

प्रेसिडेंट साहेब ह्मणाले कीं या विषयीं आह्मास अंदेशा आहे.

आनरबल वेस्त्राप साहेब ह्मणाले कीं कोणताही आक्टाचा मसुदा प्रसिद्ध होण्यास तीन

आठवडे अगदीं थोडा वेळ आहे.

आनरबल् फ्रियर साहेब ह्मणाले कीं कोणते आक्राचे मसुद्याचा विच्यार करण्याचें महकूब करण्याचा अधिकार कौन्सिलास आहे यास्तव हा नियम आहे तसा ठेवावा असें आमचें मत नाहीं.

दुसरे मेंबरांनीं नियम कायम ठेवण्याविषयीं आपलीं मतें जाहीर केलीं.

तो नियम कबूल झाला.

प्रेसिडेन्ट साहेबानीं २६ वे नियमाविषयीं विच्यारलें.

तेव्हां आनरबल वेस्ट्राप साहेब या नियमांच्या पक्ष धरून ह्मणाले कीं फेरफाराविषयीं विच्यार करण्याचें २ रे नियमा अन्वयें प्रेसिडेंट साहेबांस नाहीं ह्मणतां येत नाहीं. २६ व २७ या दोन नियमांचा विच्यार एकत्र केला पाहिजे.

आनरबल् फ्रियर साहेबानीं विच्यारलें कीं पांचवे ओळींत "पाठवावा" या शब्दाबद्दल "पाठविण्याचा अधिकार आहे" हे शब्द घातल्यास कांहीं हरकत आहे काय?

आनरबल् वेस्ट्राप साहेब ह्मणाले कीं आमचे तर्फे कांहीं हरकत नाहीं.

नंतर "पाठवावा" या शब्दाबद्दल "पाठविण्याचा अधिकार आहे" हे शब्द घालावे किंवा नाहीं याविषयीं प्रेसिडेन्ट साहेबानीं विच्यारलें. — घालावे ही गोष्ट कबूल झाली.

सदर्हू प्रमाणें सुधारलेला नियम सर्वांनीं कबूल केला.

प्रेसिडेंट साहेबानीं २७ वे नियमाविषयीं विच्यारलें. — तो कबूल झाला.

प्रेसिडेंट साहेबानीं २८ वे नियमाविषयीं विच्यारलें. — तो कबूल झाला.

प्रेसिडेंट साहेबानीं २९ वे नियमाविषयीं विच्यारलें. — तो कबूल झाला.

प्रेसिडेंट साहेबानी ३० वे नियमाविषयीं विच्यारलें. — तो कबूल झाला.

प्रेसिडेंट साहेबानीं ३१ वे नियमाविषयीं विच्यारलें. — तो कबूल झाला.

प्रेसिडेंट साहेबानीं ३२ वे नियमाविषयीं विच्यारलें. — तो कबूल झाला.

प्रेसिडेंट साहेबानीं ३३ वे नियमाविषयीं विच्यारलें.

तेव्हां आनरबल फ्रियर साहेब ह्मणाले कीं शेवटले शब्द काढून टाकावे कारण विक्टोरिया राणीचे कारकीर्दीचे २४ वे व २५ वे वर्षांत ६७ वा च्यापटर ह्मणून आक्ट ठरला आहे त्याचे ४५ वे कलमांत याबाबद ठराव केलाच आहे.

आनरबल् वेस्ट्राप साहेब ह्मणाले कीं आह्मी हा नियम गवरनर जनरल साहेबांचे नियमास अनुसरून केला आहे, परंतु आनरबल् फ्रीयर साहेब जो फेरफार करण्यास सांगतात तो फेरफार करण्याविषयीं आह्माकडून हरकत नाहीं.

नंतर "उभय पक्षीं मतांची संख्या सारिखी होईल तेव्हां निर्णय होण्यासाठीं आणखी एक मत देण्याचा अधिकार प्रेसिडेंट साहेबास आहे" हे शब्द काढून टाकावे किंवा नाहीं या विषयीं प्रेसिडेंट साहेबानीं अनुमतें घेतलीं. — तेव्हां काढून टाकावे ही गोष्ट सर्वांनी कबूल केली.

नंतर सदर्हू प्रमाणें सुधारलेला नियम सर्वांनी कबूल केला.

प्रेसिडेंट साहेबानीं ३४ वे नियमाविषयीं विच्यारलें. — तो कबूल झाला.

प्रेसिडेंट साहेबानीं ३५ वे नियमाविषयीं विच्यारलें. — तो कबूल झाला.

प्रेसिडेंट साहेबानीं ३६ वे नियमाविषयीं विच्यारलें. — तो कबूल झाला.

प्रेसिडेंट साहेबानी ३७ वे नियमाविषयीं विच्यारलें. — तो कबूल झाला.

प्रेसिडेंट साहेबानी ३८ वे नियमाविषयीं विच्यारलें.

तेव्हां आनरबल फ्रीयर साहेब ह्मणाले कीं "अंडर सेक्रेटारी किंवा आसिस्टंट सेक्रेटारी" हे शब्द काढून टाकावे.

"सेक्रेटारी" या शब्दाचा संपूर्ण अर्थ ४४ वे नियमांत लिहिला आहे या करितां "अंडर सेक्रेटारी किंवा आसिस्टंट सेक्रेटारी" हे शब्द जरूर नाहींत ही गोष्ट प्रेसिडेंट साहेबानीं कबूल केली.

प्रेसिडेंट साहेब ह्मणाले कीं "अंडर सेक्रेटारी किंवा असिस्टंट सेक्रेटारी" हे शब्द काढून टाकावे ही गोष्ट सर्वांनी कबूल केली.

नंतर सदर्हू प्रमाणे सुधारलेला नियम सर्वांनी कबूल केला.

प्रेसिडेंट साहेबानी ३९ वे नियमाविषयीं विच्यारलें. — तो कबूल झाला.

प्रेसिडेंट साहेबानीं ४० वें नियमाविषयीं विच्यारलें. — तो कबूल झाला.

प्रेसिडेंट साहेबानीं ४१ वे नियमाविषयीं विच्यारलें. — तो कबूल झाला.

प्रेसिडेंट साहेबानीं ४२ वे नियमाविषयीं विच्यारलें. — तो कबूल झाला.

प्रेसिडेंट साहेबानीं ४३ वे नियमाविषयीं विच्यारलें.

तेव्हां आनरबल् फ्रीयर साहेब ह्मणाले कीं या नियमाची गरज नाहीं.

आनरबल् वेस्ट्राप साहेब ह्मणाले कीं ठराव जितके स्पष्ट करतां येतील तितके करावे असें आम्चें मत आहे.

आनरबल् जगंनाथ शंकर शेट साहेब म्हणाले कीं या नियमाविषयीं कांहीं हरकत आहे असें आह्मास वाटत नाहीं.

आनरबल रुस्तमजी जमसेटजी जीजीभाई साहेब ह्मणाले कीं या प्रकरणीं ८ वे नियमांत पूर्त्ता ठराव केला आहे यास्तव हा नियम काढून टाकावा.

प्रेसिडेंट साहेब म्हणाले बहुतेक मेंबरांचें मत या नियमाविरुद्ध आहे त्यापेक्षां तो काढून टाकावा.

नियम काढून टाकला.

प्रेसिडेंट साहेबानीं ४४ वे नियमाविषयीं विच्यारलें आणि म्हणाले ४४ चे ४३ करावे.

ही गोष्ट सर्वांनी कबूल केली.

आनरबल् वेस्ट्राप साहेब म्हणाले कीं सदर्हू प्रमाणे सुधारलेले नियम छापते वेळीं, रकान्यांत मुंबईचे नियम म्हणून ज्या टिपा लिहिलेल्या आहेत त्या काढून टाकाव्या. — ही गोष्ट सर्वांनी कबूल केली.

प्रेसिडेंट साहेब म्हणाले कीं सदर्हू प्रमाणे सुधारलेले नियम छापून त्यांची एकप्रत मंजूर होण्यासाठीं आलीज्या गवरनर साहेबांकडे पाठवावी. — ही गोष्ट सर्वांनी कबूल केली.

प्रेसिडेंट साहेब म्हणाले कीं "सन १८५० चे २६ वे आक्टा अन्वयें नेमलेले म्युनिसिपल् कमिशनरांचे अधिकार वाढविण्याविषयींचे आक्टाचे मसुद्याचा" आतां पुनः विच्यार करणे आहे.

नंतर तो मसुदा दुसरे वेळीं वाचावा अशी त्याणी दरखास्त केली.

आनरबल् वेस्ट्राप साहेब म्हणाले कीं मसुद्याचे शेवटापासून १५ वे ओळींत "जमा होतील" हा शब्द आहे तो काढून टाकावा—ही गोष्ट सर्वांनी कबूल केली.

आनरबल् फ्रीयर साहेब म्हणाले कीं १ ले कलमाचे ८ वे ओळींत "गांवा बाहेरील वस्त्या" या शब्दाबद्दल "गांवा बाहेरील वस्ती" हा शब्द घ्याहावा. — ही गोष्ट सर्वांनी कबूल केली.

आनरबल् फ्रीयर साहेब म्हणाले कीं इस्पिटलाकडे चतुर्थांश ऐवज लावण्याचा अधिकार आहे आणि दवाखान्याकडे चतुर्थांश ऐवज लावण्याचा अधिकार आहे आणि शाळेकडे चतुर्थांश ऐवज लावण्याचा अधिकार आहे म्हणजे एका गांवांत किंवा एका गांवा बाहेरील वस्तींत तीन चतुर्थांश ऐवज लावण्याचा अधिकार आहे असा अर्थ मसुद्याचे १ ले कलमावरून होतो.

आनरबल् वेस्ट्राप साहेब म्हणाले कीं कायद्याचे परिभाषे प्रमाणे तसा अर्थ होणार नाहीं.

आनरबल् जगंनाथ शंकर शेट साहेब म्हणाले कीं रस्त्यांवर पाणी शिंपण्या विषयीं त्यांत कांहीं ठराव नाहीं. त्यास "पाणी शिंपणे" हे शब्द वाढवावे अशी त्याणी दरखास्त केली.

आनरबल फ्रीयर साहेब म्हणाले कीं या बाबद तकरार पडे तों पर्यंत थांबलें असतां ठीक पडेल.

नंतर आनरबल् जगंनाथ शंकर शेट साहेब म्हणाले कीं "तो दिल्या नंतर" या शब्दा पुढें आणखी खालीं लिहिल्या प्रमाणे ठराव घालावा, तो येणे प्रमाणेः—"आणि सदर्हू कामा खेरीज आणखी सदर्हू "करांचा वाजवी भाग सदर्हू गांवांतील किंवा बाहेरचे वस्तींतील सार्वजनिक रस्ते शिंपण्या-

"कईलावण्याच्या अधिकार सदर्हू कमिशनरांस देणे हेंही योग्य आहे" आणि खालीं लिहिल्याप्रमाणे ३ रें एक कलम वाढवावें." ३ रें. आणखी असें ठरविलें आहे कीं म्युनिसिपल करांचा वाजवी भाग स-"दर्हू प्रकारचे कोणतेही गांवांतील किंवा गांवा बाहेरचे वस्तींतील सार्वजनिक रस्ते शिंपण्याकडे ही "लावण्याच्या अधिकार सदर्हू कमिशनरास आहे."

आनरबल फ्रीयर साहेब म्हणाले कीं आक्टाच्या मसुदा आहे तसा ठेवला असतां बरें आहे.

आनरबल ट्रिस्ट्राम साहेब म्हणाले कीं क्लिष्ट कल्पने सारिखी ही गोष्ट आहे.

आनरबल वेस्ट्राप साहेब म्हणाले कीं म्युनिसिपल कमिशनरांस रस्ते शिंपविण्याचा अधिकार सन १८५० चे २६ वे आक्टावरून आहे किंवा नाहीं या विषयीं मोठा आंदेशा आहे. त्यांस तो अधिकार नसेल तर त्यांस तो असावा हें जरूर आहे असें आम्हास वाटतें आणि जबाबदारी दूर करण्याची एक रकम वाढवावी.

आनरबल सेट प्रेमाभाई हेमाभाई म्हणाले कीं सदर्हू फेरफाराची जरूर नाहीं.

प्रेसिडेंट साहेबानीं मेंबरांचें अनुमत घेतल्यानंतर म्हणाले सदर्हू फेरफार सर्वांमते कबूल झाला.

मग आनरबल वेस्ट्राप साहेबानी जबाबदारी दूर करण्या विषयींची रकम गुजराविली.

प्रेसिडेंट साहेबानी खालीं लिहिले रकमे विषयीं अनुमतें घेतलीं.

४ थें "आणखी असें ठरविलें आहे कीं सदर्हू प्रकारचे गांवांतील किंवा गांवा बाहेरचे वस्तींतील सार्वजनिक रस्ते शिंपविण्याकडे म्युनिसिपल करांचा कोणताही भाग वास्तवीक आजपर्यंत खर्च केला असेल तो कायदेशीर व वाजवी रितीने खर्च केला असें समजावें." — ही गोष्ट सर्वांमतें कबूल झाली.

आनरबल फ्रियर साहेब म्हणाले कीं १ ले रकमेचे १० वे ओळींत "एक्सटेंट" व "एक्सिडिंग्" या शब्दांमध्यें "नाट" हा शब्द घालावा. आणि "आनधीहोल" हा शब्द "एक्सिडिंग्" या शब्दापुढें घालावा. आणि १२ वे ओळींत "फोर" व "धी" या शब्दां मध्यें "आल आर एनी आफ" हे शब्द घालावे आणि त्याच ओळींत "धी" व "परपजीझ" या शब्दांमध्यें "थ्री" हा शब्द घालावा.

सर्वांनी कबूल केलें.

आनरबल फ्रीयर साहेब म्हणालें कीं २ रे कलमाचे ६ वे ओळींत "रिपोर्ट" या शब्दानंतर "या बाबद" हे शब्द घालावे. — सर्वांनी कबूल केलें.

प्रेसिडेंट साहेब म्हणाले कीं मसुदा सुधारला आहे तसा तो आतां दुसरें वेळीं वाचून कायम करावा.

नंतर तो मसुदा डेप्युटी सेक्रेटारी साहेबानी दुसरे वेळीं वाचला आणि तो कायम करण्यांत आला.

प्रेसिडेंट साहेब म्हणाले कीं सन १८४३ चा ११ वा आक्ट सुधारण्या विषयींचे आक्टाचा मसुदा सिलेक्ट कमिटीकडे सोंपला होता त्याचा आतां विच्यार करणे आहे त्या विषयीं कमिटीने रिपोर्ट केला आहे तो डेप्युटी सेक्रेटारी साहेबानी वाचावा.

डेप्युटी सेक्रेटारी साहेबानी रिपोर्ट वाचला तो येणे प्रमाणे.

सन १८४३ चा ११ वा आक्ट सुधारण्या विषयींचे आक्टाचे मसुद्याचा विच्यार करून रिपोर्ट करण्याविषयीं नेमलेलें सिलेक्ट कमिटीचा रिपोर्ट.

मसुद्याचा विच्यार केल्यावरून कमिटीचे नजरेस असें येतें कीं त्यांत खालीं लिहिल्याप्रमाणे फेरफार करावे.

मसुद्याचे उद्देशाचे २ रे ओळींत "गुड" आणि "थ्री" या शब्दां मध्यें "इनफ्युचर" हे शब्द घालावे आणि उद्देशाचे ३ रे ओळींत "किंवा" या शब्दा बद्दल "आणि" हा शब्द घालावा.

उद्देशाचे ४ थे ओळींत "आफ सांग्शनिंग" या शब्दां बद्दल "टू सांग्शन" हे शब्द घालावे आणि

उद्देशाचे ७ वे ओळींत "आफ आप्रूविंग" या शब्दा बद्दल "टू अप्रूव" हे शब्द घालावे.

उद्देशाचे ९ वे ओळींत "ए शेरर इन् ए वतन" या शब्दापूर्वी "ए होल्डर आफ आर" हे शब्द घालावे.

मसुद्याचे २ रे व ६ वे ओळींत "रेवेन्यु" या शब्दापुढें "ए" हा शब्द घालावा आणि "कमिशनर" या शब्दांपुढें "आर ए पोलीस" हे शब्द घालावे. आणि मसुद्याचे २ रे व ७ वे ओळींत "व्हेन" व आथरैझ्ड" या शब्दां मध्यें "रिस्पेक्टिव्ली" हा शब्द घालावा.

आणि मसुद्याचे ११ वे ओळींत "शाल" व "बी" या शब्दामध्यें "आफटरधी पासिंग आफ धिस आक्ट हे शब्द घालावे.

यास्तव मसुदा खालीं लिहिल्या प्रमाणे वाचावा असें कमिटीचें म्हणणे आहे.

# सन १८४३ चा ११ वा आक्ट सुधारण्या विषयींचे आक्टाचा मसुदा.

सन १८४३ चे ११ वे आक्टा अन्वयें नेमलेले वतनदाराने किंवा वतनाचे हिस्सेदाराने वतनाचें काम किती मुदत पर्यंत करावें हें मंजूर करण्याचा अधिकार आणि कलेक्टराने किंवा मुख्य अधिकाऱ्याने त्याच्य कलमावरून कोणी मनुष्याची नेमणूक केली असेल ती मंजूर करण्याचा अधिकार रेवेन्यु कमिशनरास किंवा पोलीस कमिशनरांस देण्याचा अखत्यार पुढें मुंबई सरकारास देणे योग्य आहे.

यास्तव असें ठरविलें आहे कीं सन १८४३ चे ११ वे आक्टाचे ४ थे कलमांत "गवरनरइन्कौन्सिलाची आज्ञा घेऊन" हे शब्द आहेत त्या शब्दापुढें "किंवा सरकाराने अधिकार दिला असेल तेव्हां कोणतेही रेवेन्यु कमिशनराची किंवा कोणतेही "पोलीस कमिशनराची आज्ञा घेऊन" हे शब्द घालावे आणि "गवरनर इन् कौन्सिलानी खर्चीत केला पाहिजे" हे शब्द कलमाचे शेवटीं लिहिलेले आहेत त्या शब्दांपुढें "किंवा सरकाराने अधिकार दिला असेल तेव्हां कोणतेही रेवेन्यु कमिशनराने किंवा कोणतेही पोलीस कमिशनराने हे शब्द घालावे आणि सदर्हू प्रमाणे घातलेले शब्द हा आक्ट ठरल्यानंतर सन १८४३ चे ११ वे आक्टाचे च्यौथे कलमाचे भाग आहेत असें समजून त्यांचा अर्थ करावा.

आनरबल फ्रियर साहेबानी उद्देशांतील "किंवा पोलीस कमिशनर" या शब्दांस हरकत घेतली. ते ह्मणाले कीं पोलीस कमिशनरांचे कामांत दखल करण्याचा अधिकार रेवेन्यु कमिशनरांस देण्याची मुखत्यारी सरकारास असूं नये.

आनरबल् वेस्ट्राप साहेब ह्मणाले कीं "रेवेन्यु व पोलीस कमिशनरांस किंवा त्या दोघांपैकीं कोणा एकास" या शब्दांचा उपयोग केल्याने ती हरकत दूर होते.

शेवटीं आनरबल् फ्रियर साहेब ह्मणाले कीं उद्देशाचे ४ थे ओळींत "किंवा" या शब्दाबद्दल "व" हा शब्द घालावा. आणि मसुद्याचे २ रे व ३ रे व ७ वे ओळींत "रिस्पेक्टिवली" हा शब्द आहे तो काढून टाकावा. आणि मसुद्याचे १ ले व २ रे ओळींत "आर" व "ए" या शब्दामध्यें "आफ" हा शब्द घालावा. आणि त्याच प्रमाणे मसुद्याचे ६ वे व ७ वे ओळींत त्याच शब्दामध्यें तो शब्द घालावा.

प्रेसिडेंट साहेबानी ती गोष्ट कबूल करून ते असें ह्मणाले कीं सदर्हू प्रमाणे सुधारलेला मसुदा दुसरे वेळीं वाचून कायम करावा.

नंतर सदर्हू प्रमाणे सुधारलेला मसुदा डेप्युटी सेक्रेटारी साहेबानी दुसरे वेळीं वाचला आणि तो कायम करण्यांत आला.

प्रेसिडेंट साहेब ह्मणाले कीं "प्रिंसिपलसदर अमीन व सदर अमीन व मुनसफयांचे कोर्टास हिंदुस्थानाचे इतर भागांत जी हुकुमत आहे त्या प्रमाणे या प्रेसिडेन्सींतील तसेच कोर्टास आणखी

हुकुमत देण्याविषयींच्या आक्टाचा मसुदा "कौन्सिलाचे मागले सभेंत सिलेक्ट कमिटीकडें सोंपला होता त्याचा आतां बिच्यार करणे आहे. आणि तो डेप्युटी सेक्रेटारी साहेबानीं वाचावा अशी त्याणे दरखास्त केली.

## नंतर डेप्युटी सेक्रेटारी साहेबानी रिपोर्ट वाचला तो येणेप्रमाणे

## रिपोर्ट.

"कमिटीचें मत असें आहे कीं आखरच्या फैसला करण्याचा अधिकार मुनसिफांस कित्येक मुकद्म्यांत देणे अवश्य वाटत असेल तर सदर अमीनाचे व प्रिन्सिपल सदर अमीनाचेही फैसले कित्येक मुकद्म्यांत आखरचे ठरविणे योग्य आहे.

कमिटीचें आणखी असें मत आहे कीं सन १८६० चे ४२ वे आक्टाचें ३ रे कलमावर नुस्ता हवाला न देतां त्या कलमाच्या मतलबच या आक्टाचे मसुद्यांत दाखल करावा. परंतु १ ले कलमांतील मत कबूल झाल्यास सदर दिवानी अदालतीचे जज साहेबांकडे पुनः लिहून पाठविणे जरूर पडेल यास्तव कमिटीचें असें मत आहे कीं आक्टाचा सगळा मसुदा नव्याने घडावा आणि प्रिन्सिपल सदर अमीन व सदर अमीन व मुनसफ यांचे हुकुमती विषयीं जे आक्ट आहेत त्या सर्वांचा एकच नवा आक्ट करावा कारण कित्येक जिल्ह्यांत सदर अमीन नाहींत व एके जिल्ह्यांत प्रिन्सिपल सदर अमीन नाहीं.

आनरबल् फ्रीयर साहेब ह्मणाले कीं सदहू रिपोर्ट मंजूर करावा.

नंतर आनरबल् वेस्ट्राप साहेबानी सिलेक्ट कमिटीचे मतास अनुसरून भाषण केलें आणि ह्मणाले कीं सेशन संपल्यानंतर पुढले सेशनापर्यंत या विषयाचा पूर्ण विच्यार व्हावा.

नंतर रिपोर्ट मंजूर करण्याविषयींची दरखास्त सर्वमतें कबूल झाली.

मग प्रेसिडेंट साहेब ह्मणाले कीं "भागदारी वहिवाट कायम ठेवण्याविषयींचे आक्टाचे मसुद्याचा विच्यार करण्यासाठीं सिलेक्ट कमिटी नेमली आहे तींत आमचे जागीं आनरबल् फ्रीयर साहेबानीं बसावें.

प्रेसिडेंट साहेब ह्मणाले कीं अमदाबाद जिल्ह्यांतील तालुकदारां प्रकरणीं आक्टाचा मसुदा दुसरे सभेंत गुजारण्याचा आमचा इरादा आहे.

नंतर तारीख ८ वी शनवारचे प्रातःकाळचे ११ वरांपर्यंत कौन्सिल तहकूब ह्मणून प्रेसिडेंट साहेबानीं ठरविलें.

बमुजिबे हुकूम बंदेगान आलीनवाब मुस्तताब हजरत
आनरबल् गवरनर साहेब बाहादूर दर इजलास कौन्सिल.

मुकाम जंजिरे मुंबई,
तारीख १ ली मार्च सन १८६२.

लिटलूटन ह्याली ओक बेली साहेब,
डेपुटी सेक्रेटारी निसबत सरकार यांची सही.

(True translation)
VENAYEK WASSOODEW,
Oriental Translator to Government.